International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकांचा तालुका निहाय तुलनात्मक अभ्यास

**कु. शिवानी मच्छिंद्र इंगळे**

*पीएच.डी संशोधक विद्यार्थी, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त)*

*Corresponding Author - कु. शिवानी मच्छिंद्र इंगळे*

**DOI - 10.5281/zenodo.18864275**

**प्रस्तावना:**

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा देशातील उद्योजकतेवर अवलंबून आहे. भारताच्या लोकसंख्येत ४८.५% महिला आहेत, तर महिलांनी पुरुषांच्या सोबत उद्योजकीय विकास घडून आणण्यासाठी बरोबरीने अर्थाजन करून आर्थिक विकासात सहभागी होणे काळाची गरज बनली आहे. तसं पाहिलं तर उद्योगक्षेत्र महिलांच्या दृष्टीने उपेक्षित मानले जाते, परंतु आधुनिक काळात अनेक महिला उद्योजिका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

विशेषतः सूक्ष्म उद्योग (Micro Enterprises) हे महिलांना स्वयंरोजगार, आर्थिक स्वावलंबन व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारे प्रभावी माध्यम ठरत आहेत. ग्रामीण व अर्धशहरी भागात महिलांनी सुरू केलेले सूक्ष्म उद्योग कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देत आहेत.

भारत सरकारच्या Micro Small and Medium Enterprises (MSME) मंत्रालयांतर्गत १ जुलै २०२० रोजी केलेल्या वर्गीकरणानुसार सूक्ष्म उद्योग म्हणजे **“ज्या उद्योगांची यंत्रसामग्री व उपकरणामधील गुंतवणूक १ कोटी रुपयापर्यंत आणि वार्षिक उलाढाल ५ कोटी रुपयापर्यंत असते अशा उद्योगांना सूक्ष्म उदयोग असे म्हणतात.**

महाराष्ट्र राज्यात महिला सूक्ष्म उद्योजकतेचा विस्तार वेगाने होत असून, **Udyog Aadhaar (MSME) नोंदणी प्रणालीमुळे** महिला उद्योजिकांना औपचारिक अर्थव्यवस्थेत प्रवेश मिळाला आहे. या नोंदणीमुळे महिलांना विविध शासकीय योजना, वित्तीय सहाय्य, प्रशिक्षण कार्यक्रम व बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

अहमदनगर जिल्हा हा भौगोलिक, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या विविधतेने परिपूर्ण जिल्हा आहे. जिल्ह्यात काही तालुके शहरीकरण व औद्योगिक विकासामुळे प्रगत आहेत, तर काही तालुके अजूनही ग्रामीण व मागास स्वरूपाचे आहेत. या असमान विकासाचा थेट परिणाम महिला सूक्ष्म उद्योजिकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर होताना दिसतो. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योगांचा तालुका-वार तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

सदर संशोधनात अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकांची आर्थिक स्थिती, सामाजिक बदल, तसेच तालुका-वार विषमता समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी Udyog Aadhaar (MSME) पोर्टलवरील दुय्यम माहितीचा आधार घेऊन तालुका-वार तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासातून जिल्ह्यातील महिला उद्योजकतेची सद्यस्थिती, विकासाची दिशा व भविष्यातील धोरणात्मक गरजा स्पष्ट होण्यास मदत होईल.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):**

1. महिला सूक्ष्म उद्योगांचा तालुका-वार तुलनात्मक अभ्यास करणे.
2. महिला सूक्ष्म उद्योजिकांच्या विकासातील तालुका-वार विषमता ओळखणे.
3. महिला उद्योजकतेच्या विकासासाठी उपाययोजना व शिफारसी सुचवणे.

**संशोधनाची गृहितके (**Hypothesis**):**

1. अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकांची स्थिती तालुका-वार वेगवेगळी आहे.
2. शहरी व अर्धशहरी तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण ग्रामीण तालुक्यांच्या तुलनेत जास्त आहे.
3. Udyog Aadhaar नोंदणीमुळे महिला उद्योजिकांच्या आर्थिक स्वावलंबनात वाढ झाली आहे.

**संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study):**

- तालुका-वार अभ्यासामुळे प्रगत व मागास तालुक्यांमधील फरक अधोरेखित होतो.
- या अभ्यासातून धोरणकर्ते, प्रशासन व MSME विभागाला महिला उद्योजकतेसाठी योग्य निर्णय घेण्यास मदत होईल.
- महिला सूक्ष्म उद्योगांच्या विकासासाठी नवीन योजना, प्रशिक्षण व वित्तीय सहाय्य यांची गरज स्पष्ट होते.
- संशोधन विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना व सामाजिक संशोधकांना संदर्भ साहित्य म्हणून उपयुक्त ठरेल.

**संशोधन पद्धती:**

**तथ्य संकलन:**

- हा अभ्यास पूर्णतः दुय्यम माहितीवर आधारित आहे. अहमदनगर जिल्ह्यातील उद्योग आधार / उद्यम नोंदणी केलेल्या सूक्ष्म महिला उद्योजिका या माहितीचा उपयोग करून विश्लेषण करण्यात आले आहे.
- सदर संशोधन हे वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) स्वरूपाचे आहे. अहमदनगर जिल्ह्यातील सूक्ष्म महिला उद्योजिकांची सामाजिक-आर्थिक स्थिती, व्यवसायाचे स्वरूप, अडचणी व संधी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**तथ्यविश्लेषण:**

**१) वर्णनात्मक सांख्यिकीय विश्लेषण:** प्रस्तुत संशोधनात अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकायांचा उद्यमआधार नोदणी या सांख्यिकीय माहितीचे संकलन ककरूनवर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**2) तुलनात्मक विश्लेषण:** तालुका निहायसूक्ष्म उद्योगांची संख्या ही पाय चार्ट व आलेख यांच्या सहाय्याने तुलनात्मक रित्या दर्शवण्यात आली आहे.


**3) सांख्यिकीय साधने:** संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, स्तंभ आलेख (Column Chart) यांचा वापर करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार साध्या सांख्यिकीय पद्धती वापरण्यात आल्या आहेत.

**संशोधनाच्या मर्यादा:**

- संशोधन फक्त अहमदनगर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन पूर्णपणे दुय्यम स्रोतावर अवलंबून आहे.

| अक्र | तालुका | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 25 |
| 2 | संगमनेर | 20 |
| 3 | कोपरगाव | 10 |
| 4 | श्रीरामपूर | 10 |
| 5 | राहुरी | 8 |
| 6 | राहता | 7 |
| 7 | नेवासा | 6 |
| 8 | पारनेर | 5 |
| 9 | पाथर्डी | 3 |
| 10 | अकोले | 2 |
| 11 | शेवगाव | 2 |
| 12 | कर्जत | 2 |
| | एकूण | १०० |

वरील तक्त्या वरून असे स्पष्ट होते की अहमदनगर (25%) व संगमनेर (20%) या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कोपरगाव व श्रीरामपूर या तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाची (प्रत्येकी 10%) नोंदणी दिसून येते. त्याउलट आकोले, शेवगाव व कर्जत या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण अत्यल्प (प्रत्येकी 2%) आहे.





**तालुका-वार महिला सूक्ष्म उद्योगांची स्थिती:**

अहमदनगर जिल्ह्यातील सूक्ष्म महिला उद्योजिकांचे तालुकानुसार विश्लेषण करून प्रत्येक तालुक्यातील उद्योजकतेचे प्रमाण, व्यवसायाचे स्वरूप व अडचणी यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

अहमदनगर व संगमनेर या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण तुलनेने अधिक असून, यामागे शहरीकरण, बाजारपेठेची उपलब्धता, वाहतूक सुविधा व वित्तीय संस्थांची सुलभता ही प्रमुख कारणे दिसून येतात. त्याउलट आकोले, शेवगाव व कर्जत या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळते.

| **अक्र** | **तालुका** | **महिला सूक्ष्म उद्योगांची स्थिती** | **प्रमुख उद्योग प्रकार** |
|---|---|---|---|
| **1** | नगर | जास्त | अन्न प्रक्रिया, सौंदर्यप्रसाधने, साबण, अगरबत्ती, सेवा उद्योग |
| **2** | संगमनेर | जास्त | कृषी प्रक्रिया, खत उद्योग, स्वयं-सहायता गट |
| **3** | कोपरगाव | मध्यम | शेतीपूरक उद्योग, खत व बियाणे |
| **4** | श्रीरामपूर | मध्यम | उत्पादन उद्योग, सेवा क्षेत्र |
| **5** | राहुरी | मध्यम | कृषी सेवा, अन्न प्रक्रिया |
| **6** | राहाता | मध्यम | घरगुती उद्योग, सौंदर्यप्रसाधने |
| **7** | नेवासा | मध्यम | कृषी आधारित सूक्ष्म उद्योग |
| **8** | पाथर्डी | कमी | सेवा उद्योग, लघु उत्पादन |
| **9** | परनेर | मध्यम | कृषी व उत्पादन उद्योग |
| **10** | आकोले | कमी | दुग्धव्यवसाय, शेतीपूरक उद्योग |
| **11** | शेवगाव | कमी | घरगुती व सेवा उद्योग |
| **12** | कर्जत | कमी | कृषी सेवा उद्योग |




वरील Pie Diagram वरून असे स्पष्ट होते की अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे 45 टक्के महिला सूक्ष्म उद्योग शहरी व बाजारपेठ सुलभ असलेल्या तालुक्यांमध्ये केंद्रित आहेत. सुमारे 35 टक्के उद्योग मध्यम स्वरूपाच्या तालुक्यांमध्ये आढळतात, तर 20 टक्के उद्योग ग्रामीण व दुर्गम तालुक्यांमध्ये आहेत.

**निष्कर्ष:**

सदर संशोधनातून असे स्पष्ट होते की अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकांचा विकास हा महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. Udyog Aadhaar (MSME) नोंदणीमुळे महिलांना औपचारिक अर्थव्यवस्थेत सहभागी होण्याची संधी मिळाली असून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून त्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल झालेला आहे.

तथापि, या विकासात तालुका-वार असमानता स्पष्टपणे दिसून येते. अहमदनगर व संगमनेर या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांची नोंदणी उच्च स्तरावर आढळते, तर कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी, राहाता, नेवासा व परनेर या तालुक्यांमध्ये मध्यम स्तरावर विकास दिसून येतो. आकोले, शेवगाव, कर्जत व पाथर्डी या ग्रामीण व दुर्गम तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांची नोंदणी कमी असल्याचे आढळते.

अहमदनगर व संगमनेर या तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण तुलनेने अधिक असून, यामागे शहरीकरण, बाजारपेठेची उपलब्धता, वाहतूक सुविधा व वित्तीय संस्थांची सुलभता ही प्रमुख कारणे दिसून येतात. अकोले, शेवगाव व कर्जत या ग्रामीण तालुक्यांमध्ये उद्योगांची संख्या कमी असून आर्थिक अडचणी व संसाधनांचा अभाव जाणवतो.”

एकूणच, अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उद्योजिकांचा विकास समाधानकारक असला तरी सर्व तालुक्यांमध्ये समतोल व शाश्वत विकासासाठी विशेष धोरणात्मक उपायांची आवश्यकता असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**तालुका-वार विषमता : कारणमीमांसा:**

तालुका-वार अभ्यासातून असे स्पष्ट होते की महिला सूक्ष्म उद्योगांच्या विकासात दिसणाऱ्या विषमतेमागे विविध घटक कारणीभूत आहेत. ग्रामीण व दुर्गम तालुक्यांमध्ये प्रशिक्षणाची कमतरता, माहितीचा अभाव, वित्तीय सुविधा मिळण्यात येणाऱ्या अडचणी व बाजारपेठेपासूनचे अंतर ही प्रमुख कारणे आहेत. तर शहरी तालुक्यांमध्ये या सुविधा उपलब्ध असल्यामुळे महिला उद्योजिकांचा विकास अधिक प्रमाणात झालेला दिसतो.

**या विश्लेषनावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात**

1. काहीतालुकामध्ये सूक्ष्म उद्योग नोदणी जास्त आहे तर काही तालुकांमध्ये कमी आहे यावरून अहमदनगर जिल्ह्यातील महिला सूक्ष्म उदोजीकांची स्थिती तालुका वार वेगळी आहे हे गृहीतक सत्य ठरते.
2. नगर,संगमनेर या सारख्या शहरी तालुक्यात कर्जत शेवगाव या सारख्या ग्रामीण तालुक्या पेक्षा महिला सूक्ष्म उद्योजिकांची संख्या जास्त आहे यावरून शहरी व अर्धशहरी तालुक्यामध्येसूक्ष्म उद्योगांचे प्रमाण ग्रामीण तालुका पेक्षा जास्त आहे हे गृहीतक सत्य ठरते

**उपाययोजना:**

1. ग्रामीण व दुर्गम तालुक्यांमध्ये महिला सूक्ष्म उद्योजिकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.
2. महिलांना उद्योगासाठी सुलभ कर्ज उपलब्ध होण्यासाठी बँक व वित्तीय संस्थांनी विशेष योजना आखाव्यात.
3. महिला उद्योजिकांमध्ये Udyog Aadhaar व MSME योजनांबाबत जागरूकता वाढविण्यासाठी शिबिरे आयोजित करावीत.
4. महिला सूक्ष्म उद्योगांसाठी बाजारपेठ, विक्री व विपणन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
5. तालुका-वार मागास भागांसाठी विशेष धोरणात्मक हस्तक्षेप (Area-specific policy) राबवावा.
6. स्वयं-सहायता गट (SHG) व महिला बचत गटांच्या माध्यमातून महिला उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे.

**संदर्भ:**


1. आगलावे प्रदीप,"सामाजिकसंशोधन,पद्धतीशास्त्र व तंत्रे",श्री साईनाथ प्रकाशन1,भगवा घर कॉम्प्लेक्स, धरमपेठ नागपूर
2. http://msme.gov.in
3. https://di.maharashtra.gov.in